## प्रेसनोट

# " मुलीकरीता संरक्षण शिबीराचे आयोजन"

जा.क्र. ५३३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०७/२०१७

भंडारा :— आज दिनांक २६/०७/२०१७ ते २९/०७/२०१७ रोजी पोलीस बहुद्देशीय सभागृह, भंडारा येथे महाराष्ट्र राज्य महिला आयोग व पोलीस विभागाच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम सुरू आहे. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. पोलीस अधिक्षक विनीता एस, कार्यक्रमाचे उद्घाटक मा. जिल्हाधीकारी साहेब भंडारा सुहास दिवसे यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. तसेच कार्यक्रमाला उपस्थित पाहुणे श्री मनोज कुमार सुर्यवंशी, मुख्य कार्यकरी अधिकारी, अप्पर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर, हे कार्यक्रमाला उपस्थित होते.

यावेळी मा. जिल्हाधीकारी साहेब, यांनी आपल्या भाषणात सांगितले की "सर्वात पुजणीय व्यक्ती आपली आई असते तिचे मान ठेवावे. महिलेला सन्मान देणे गरजेचे आहे. मुलीना मुलापेक्षा जास्त प्रेम करावे" मोबाईल मुळे अनेक समस्या निर्माण होतात. वयाच्या २१ वर्ष पर्यत अभ्यास करुन समाजात प्रतिष्ठीत व्यक्ती बनायचे आहे. मुलीनी स्वत:चे पायावर उभे राहावे मुलींनी आपल्या खान पानाकडे विषेश लक्ष देण्यास कळविले. आपण सक्षम असल्यास समोरची व्यक्ती त्रास देणार नाही. मुलीनी स्वत:ला कमजोर समजु नये चांगले मित्र ,मैत्रिणी असाव्यात लहान मुलीमध्ये पळुन जाण्याचे प्रमाण अधिक आहे. समाज बदलावयाची मुलीमध्ये तयारी असावी.

मा. मुख्य कार्यकारी भंडारा, यांनी आपले भाषणात, मुली बद्दल सांगितले की, समाजामध्ये लिंग भेद करुन नये. स्त्री शक्तीचे वेगळे महत्व आहे. समाजात वावरतांना मुले हे आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहे. ही भावना काढुन टाकावी. वेळेवर अभ्यास, खेळ सर्व गोष्टी कराव्यात जन्म झाल्यानंतर सर्व अवस्थानां समोर जात असतो ज्याठिकाणी आपल्याला शेर बाजी करत असल्यास लगेच तक्रार करावी व प्रतीकार कारावा. स्त्रिया खुप धाडसी व सामर्थी असतात, कॅरीअर कडे सर्वात जास्त लक्ष दयावे.

यावेळी मा. पोलीस अधिक्षक विनीता एस, यांनी आपल्या भाषणात फेसबुक बाबत घडत असलेल्या गुन्हयाबाबत माहिती दिली. कार्यशाळेचे उद्देश हेच आहे की तुम्ही कोणत्याही आमीषाला बळी जावु नका चित्रपटामध्ये बघुन मुलीनी सुध्दा अश्या प्रकारे कामे करु नये , प्रत्येक मुलीला चांगले आयुष्य जगता आले पाहीजे , मुले मुंलीना कशाप्रकारे त्रास देतात याबद्दल प्रात्यक्षित करून दाखवीले मुंलीना स्वत:चे रक्षण करता आले पाहीजे मुलींना आतापासुन आपले महत्वकांक्षा ठरवुन ठेवावे. स्वत: शिकुन स्वत: घडायचे आहे. 'स्वरंक्षण' हया विषयावर प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रत्येक शाळेमधुन १० मुलींना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.(टि.वो.टि) प्रशिक्षणाचे उद्देश सफल होणार आहे.

यावेळी कार्यकमाला भंडारा येथील नानाजी जोशी विदयालय शहापुर, जिल्हा परिषद विदयालय भंडारा ,भागिरथ भाष्कर हायस्कुल टवेपार ,सावित्रीबाई फुले माध्यमीक विदयालय बेला, बन्सीलाल लाहोटी नुतन महाराष्ट्र विदयालय भंडारा,जकारदर कन्या विदयालय, नुतन कन्या विदयालय, लाल बहादुर शास्त्री विदयालय, विनोद ज्युनीयर कॉलेज सिल्ली, मौलाना अब्दुल कलाम आझाद उर्दु स्कुल भंडारा महेद्र कनिष्ट महाविदयालय बेला,भागिरथ भाष्कर विदयालय, राष्ट्रीय विदयालय भंडारा, शंकरराव काळे कला महाविदयालय कारधा, अंकुर विदया मंदीर भंडारा, महीला समाज भंडारा जे.जे.हायस्कुल कला कनिष्ठ महाविदयालय भिलेवाडा, श्रीगणेश हॉयस्कुल भंडारा, प्रकाश हायस्कुल कारधा,नगर परिषद गांधी विदयालय भंडारा नुतन कन्या विदयालय भंडारा भागरिथा भाष्कर हाय स्कुल भंडारा इ. शांळेचे समावेश होते.

यावेळी झालेल्या कार्यक्रमाचे सुत्र संचालन योगिनी नाकतोडे व आभार प्रर्दशन वैशाली केळकर यांनी केले.

(ऐ.टी. सुनगार)
स.पो.निरीक्षक
नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९८२३१२३३३६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.